दै. लोकमत दि. 16/12/19

दै. लोकमत दि. 16/12/19

# खंडणीचा गुन्हा; आरोपी ताब्यात

## मुखेड : प्रत्येक महिन्याला ३ हजार रुपये देण्याची केली होती मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुखेड :** शहरातील हॉटेल आराम बार अँड रेस्टॉरंटकडून दरमहा तीन हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्याविरुद्ध मुखेड पोलिसांत गुन्हा दाखल झाल्याबरोबर पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. यामुळे अशा गुन्हेगारीला आळा बसणार आहे.

शहराच्या मध्यभागी आराम हॉटेल असून फिर्यादी श्रीकांत गरुडकर (वय ३४, रा. मुखेड) यांच्या फिर्यादीवरुन आरोपी नदीम शेख (वय २९, रा.मुखेड)




हा हॉटेलमध्ये येऊन दर महिन्यास तीन हजार रुपयांची खंडणीची मागणी केली. त्यास खंडणी देण्यास नकार दिला असता हॉटेलमधील नोकरास लाथाबुक्क्याने मारहाण केली व हॉटेलमधील काचेचे ग्लास, फायबर खुर्च्यांची तोडफोड करुन चाकू काढून जिवे मारण्याची धमकी देत दहशत पसरविली.

याबाबत मुखेड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीस अटक करुन पोलीस कोठडीत रवानगी केली.

या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक नरसिंग आकुसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जी.डी. चित्ते हे करीत आहेत.